मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडमध्ये महाराष्ट्रातील सर्वात मोठे अश्व- देशी गोवंश पशु प्रदर्शन!

## अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचा लक्षवेधी उपक्रम

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**
गोवंश संवर्धनाचा संदेश देण्यासाठी पिंपरी- चिंचवडमध्ये महाराष्ट्रातील सर्वात मोठे अश्व व देशी गोवंश पशू प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील पशू पालकांना 'रेकॉर्ड ब्रेक' उपक्रमात सहभागी होण्याची संधी निर्माण झाली आहे. बैलगाडा शर्यत बंदी उठवण्यासाठी गल्लीपासून दिल्लीपर्यंत यशस्वी लढा उभारणारे आणि गोसंवर्धनासाठी चळवळ उभी करणारे गोरक्षक आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त अखिल




भारतीय बैलगाडा संघटनेच्या पुढाकाराने मोशी येथील आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र येथे दि. २५ व २६ नोव्हेंबर २०२३ रोजी भव्य देशी गोवंश प्रदर्शन व पशु आरोग्य शिबीर भरविण्यात येणार आहे. भारतातील सर्व जातीचे अश्व व गोवंश पशू प्रदर्शन तसेच आरोग्य शिबीरासह एकूण १७ प्रकारातील पशूंचा' रॅम्प वॉक' असलेले हे देशातील पहिले देशी गोवंश पशू प्रदर्शन आहे. देवनी, खिल्लार, लाल कंधारी, साहिवाल, लाल सिंधी, गीर, ओंगोले, वेचूर अशा विविध गोवंशासाठी प्रजातिनिहाय स्पर्धा घेण्यात येणार आहे. स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय असे क्रमांक काढण्यात येणार आहेत. पहिल्या क्रमांकाच्या गोवंश आणि पशूंचे 'रॅम्प वॉक' होणार आहे, असा प्रयत्न भारतात प्रथमच होत आहे. कोविड सारख्या महामारीच्या काळात देशी गोवंशाचे आणि त्याच्या उत्पादनाचे महत्त्व जगाला कळले आहे. त्यामुळे याबाबत जनजागृती आणि गो संवर्धनाचा संदेश तळागाळात पोहोचला पाहिजे. तसेच, पुणे जिल्ह्यातील शासकीय व अशासकीय शाळांच्या विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी. ज्यामुळे भावी पिढीलासुद्धा गोवंशाचे महत्त्व कळेल. गतवर्षी खिल्लार या एकाच प्रकारातील प्रदर्शनामध्ये २५० हून अधिक गोवंश सहभागी झाले होते. यावर्षी विविध देशी प्रजातींचे दीड हजार पशू प्रदर्शनामध्ये सहभागी होतील, अंदाज आयोजकांनी व्यक्त केला.

### सहभागी होण्यासाठी नोंदणी आवश्यक

» देशी गोवंश प्रदर्शन व पशु आरोग्य शिबीरामध्ये सहभागी होण्यासाठी नोंदणी आवश्यक आहे. त्यासाठी या लिंकवर किंवा ९३ ७९ ९० ९० ९० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. पहिल्या ५०० गोपालकांना या प्रदर्शनामध्ये सहभागी होण्यासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे. दि. ८ नोव्हेंबर ते दि. २० नोव्हेंबर २०२३ पर्यंत नोंदणी सुरू राहणार आहे. अखिल भारतीय बैलगाडा संघटना प्रमुख आयोजक असून, पुणे जिल्ह्यासह महाराष्ट्रातील गोपालकांसाठी सुवर्ण संधी निर्माण झाली आहे.

# त्या लोकांची समाज आणि इतिहास दखल घेतो : गणेश शिंदे

## कै. अंकुशराव लांडगे समाजभूषण व जीवनगौरव पुरस्कार सोहळा

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।**
इतरांबद्दल आपल्या मनात प्रेम, वात्सल्य जीवंत असेल तर आपण खऱ्या अर्थाने माणसं आहोत. मानवता सिद्ध करणारी माणसे कमी होत चालली आहेत. सामाजिक दायित्व जपत लोकांच्या मदतीला धावून जाणारी माणसे आपल्या कार्याची छाप समाजमनावर सोडून जातात. त्यांची दखल इतिहास घेतो. ज्यांच्याकडे अमाप संपत्ती आहे अशी असंख्य लोक होऊन गेली. त्यांनी सामाजिक दायित्व जपले नाही, ते समाजाच्या हिताचे नाहीत, समाज उपयोगाचे नाहीत, त्यामुळे ते नामशेष झाले. त्यासाठी संपत्ती कमावण्यासोबतच माणसाने सामाजिक दायित्व जपणे हे देखील तेवढेच महत्वाचे आहे. सामाजिक दायित्व जपणाऱ्या लोकांची समाज आणि इतिहास दखल



घेत असतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते गणेश शिंदे यांनी केले. कै. अंकुशराव लांडगे यांच्या १७ व्या स्मृती दिनानिमित्त कै. अंकुशराव लांडगे प्रतिष्ठान भोसरी यांच्या वतीने समाजातील विविध क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या मान्यवरांसाठी कै. अंकुशराव लांडगे समाजभूषण व जीवनगौरव पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.भोसरीतील अंकुशराव लांडगे सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी माजी आमदार विलास लांडे, भगवान मनसुख, संपत सांगळे,चंद्रकांत वाळके, माणिक अहिरराव भगवान, माजी नगर सदस्य अजित गव्हाणे, मोरेश्वर शेंडगे, रवी लांडगे, राहुल लांडगे, अनिल कातळे, ॲड. सत्यनारायण चांडक, संतोष लांडगे यांच्यासह पुरस्कारार्थी आणि नागरिक उपस्थित होते. गणेश शिंदे म्हणाले, आई, वडील आणि मुले यांच्यासह भावंडातील नात्यातला ओलावा अलीकडे संपत चालला आहे, नाती टिकली पाहिजेत आणि ती मजबूत झाली पाहिजेत, नात्यांचे संवर्धन होऊन ती मजबूत झाली पाहिजेत. त्यामुळे मुलांवर सामाजिक संस्कार होतात. 'हम दो हमारे दो' या सुत्रामुळे सख्खे काका आणि मावशी हे ही नाती दुर्मिळ होत चालले आहेत.

# प्रदूषण रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करा ; आयुक्तांचे निर्देश

## नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश

पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।

हवेच्या ढासळत्या गुणवत्तेवर चिंता व्यक्त करत प्रदुषण रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाने शासनाला निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर प्रदुषण रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने कराव्यात, असे निर्देश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. बांधकाम साहित्याची वाहतूक करताना आच्छादन करून वाहनातून ने आण करावी, अशी सूचनाही त्यांनी केली.

महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनामध्ये आज या विषयावर आयुक्त सिंह यांच्या अध्यक्षतेखाली महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, शहर अभियंता मकरंद निकम, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सह शहर अभियंता प्रमोद ओंभासे, संजय कुलकर्णी, डॉ. ज्ञानदेव जुंधारे, मनोज सेठिया, आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे, शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अण्णा बोदडे, उमेश ढाकणे, राजेश आगळे, सिताराम बहुरे, अंकुश जाधव, कार्यकारी अभियंता देवण्णा गट्टूवार, विजयकुमार काळे, बापू गायकवाड, राजेश शिंदे, अशोक जावळे, विजय ओहोळ, अनिल शिंदे, देवेंद्र बोरावके, राजेंद्र निंबाळकर, प्रेरणा सिनकर, जाहीर शेख यांच्यासह पर्यावरण, स्थापत्य, बांधकाम परवानगी, बीआरटीएस, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, वैद्यकीय, माहिती व जनसंपर्क आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



हवेतील वाढत्या प्रदुषणाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने स्वत:हून दाखल केलेल्या जनहित याचिकेवर नुकतीच सुनावणी झाली. वाढत्या वायू प्रदुषणाला रोखण्यासाठी शासनाने तसेच महानगरपालिकांनी दखल घेऊन या गंभीर विषयावर तातडीने उपाययोजना कराव्यात तसेच केलेल्या कार्यवाहीबद्दल अहवाल सादर करावा, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने दिले. याबाबत शासनाने गंभीर पाऊल उचलले असून प्रदुषण नियंत्रणाच्या दृष्टीने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. हवेतील प्रदुषण रोखण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून देखील विविध निर्देश आणि मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. विविध शहरांची प्रदुषणाच्या पातळीची आकडेवारी विचारात घेऊन उपाययोजनांची तीव्रता वाढविण्याच्या सूचना देखील यामध्ये नमूद करण्यात आल्या आहेत. वायू प्रदुषण रोखण्यासाठी शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी संपुर्ण राज्यात करण्यासाठी आज राज्याचे मुख्य सचिव मनोज सौनिक यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेण्यात आली. या बैठकीस नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. गोविंद राज यांच्यासह विविध महानगरपालिकांचे आयुक्त उपस्थित होते. मुंबई उच्च न्यायालयाने सुनावणीमध्ये दिलेल्या विविध बाबींवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. तसेच प्रदुषण रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश मुख्य सचिवांनी यावेळी दिले. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कार्यक्षेत्रात विविध माध्यमातून होणारे वायु प्रदुषणरोखण्यासाठी संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत.

सार्वजनिक स्थानांमध्ये अस्वच्छता करणे, कचरा जाळणे अशा विविध कारणांसाठी संबंधित व्यक्ती अथवा आस्थापनांवर महापालिकेच्या वतीने कडक कारवाई केली जाणार आहे. यासाठी विशेष पथके तयार करून नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी क्षेत्रीय अधिकारी तसेच संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना दिले. बांधकाम साहित्याची वाहतूक करताना आच्छादन करून वाहनातून ने आण करावी, वाहनाच्या टायरला चिकटलेली माती मुख्य रस्त्यावर आल्याने धुलीकणांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होतो. त्यामुळे संबंधित वाहनाच्या टायरवर जलफवारणी (स्प्रिंकलर) करूनच अशी वाहने मुख्य रस्त्यावर चालवावीत, बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी योग्य प्रकारचे कापडी आच्छादन आणि बॅरिकेड्स लावाव्यात आदींबाबत स्वतंत्र आदेश महापालिकेच्या वतीने जारी केले जाणार आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरूद्ध दंडात्मक कारवाई देखील केली जाणार आहे. याबाबत जारी करण्यात आलेल्या विविध मार्गदर्शक सूचना आणि आदेशांची माहिती संबंधितांपर्यंत पोहोचविण्यासाठी बैठका घेण्यात याव्यात, असे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी दिले.

# पथनाट्यातून फटाकेमुक्त दिवाळीसाठी प्रबोधन!

## फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची सामुदायिक शपथ

पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।

'फ फ फटाक्याचा अन् प्र प्र प्रदूषणाचा!' या पथनाट्याच्या प्रभावी सादरीकरणातून राजमाता जिजाऊ उद्यान, पिंपळे गुरव येथे रविवार (दि.५) दिलासा संस्था, कलारंजन प्रतिष्ठान, मानवी हक्क संरक्षण आणि जागृती या तीन संस्थांनी फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याविषयी नागरिकांचे प्रबोधन केले. यावेळी वृक्षमित्र अरुण पवार, ह. भ. प. अशोकमहाराज



गोरे, ज्येष्ठ साहित्यिक प्रदीप गांधलीकर, तानाजी एकोंडे, कलारंजनचे अध्यक्ष श्रीकांत चौगुले, दिलासाचे अध्यक्ष सुरेश कंक आणि मानवी हक्क संरक्षणचे अध्यक्ष अण्णा जोगदंड यांच्यासह साहित्य, संस्कृती आणि सामाजिक क्षेत्रातील आदी उपस्थित होते.

'फ फ फटाक्याचा अन् प्र प्र प्रदूषणाचा!' या पथ नाट्यात संजना करंजावणे, अण्णा जोगदंड, शामराव सरकाळे, सुभाष चव्हाण, मुरलीधर दळवी, नंदकुमार कांबळे, श्रावणी अडागळे, सारंगी करंजावणे, सुरेश कंक यांनी सहभाग घेऊन फटाक्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणाविषयी नाट्यपूर्ण प्रसंगांचे सादरीकरण करून उद्बोधक माहिती दिली. यावेळी फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची सामुदायिक शपथ घेण्यात आली त्यामध्ये आत्माराम हारे, रेखा सातोकर, तुळशीराम जगदाळे, उमा मोटेगावकर, गणेश वाडेकर, विजया नागटिळक, संजय गमे, जयश्री गुमास्ते, वामन भरगंडे, बाळासाहेब साळुंके, दिनेश घोगरे, योगिता कोठेकर, नीलेश हंचाटे, सागर जाधव, सूर्यकांत तिकोणे, अंकुश जाधव यांनी सहभाग घेतला. तर सुभाष चव्हाण यांनी आभार मानले.

# विद्यापीठाच्या परिसरात जमावबंदी!

## हाणामारी, मोर्चांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा आदेश

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** गेल्या काही दिवसांत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यार्थी संघटनांमध्ये हाणामारीच्या घटना घडल्यामुळे पुणे सहपोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी विद्यापीठाच्या आवारात प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. त्यानुसार ७ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत जमावबंदी लागू करण्याचा आदेश देण्यात आला असून, आदेशाचा भंग करणाऱ्यांवर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे. विद्यार्थी संघटनांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेली हाणामारी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी आक्षेपार्ह मजकूर लिहिल्याची तक्रार, राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यां कडून विद्यार्थ्यांना मारहाण अशा घटनांमुळे विद्यापीठात तणावाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर




कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी पुणे पोलिसांना पत्र दिले होते. त्यानंतर पुणे सहपोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी विद्यापीठाच्या परिसरात जमावबंदी लागू करण्याचे आदेश दिले. गेल्या काही दिवसांत विद्यापीठाच्या बाहेरील व्यक्ती, संघटना यांनी विद्यापीठाची किंवा पोलिसांची पूर्वपरवानगी न घेता निदर्शने, आंदोलने, मोर्चा आयोजित करून, चिथावणी देणारी भाषणे, घोषणांद्वारे शांततेचा भंग करून शैक्षणिक वातावरण बाधित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या कामात व्यत्यय निर्माण होऊन अनेकदा भांडणे, मारामारी झाल्याचे निदर्शनास येते. या संदर्भात पोलिसांकडे अनेक तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यामुळे विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पूरक असे सौहार्दपूर्ण, शांततामय वातावरणाची आवश्यकता असल्याने विद्यापीठ आणि सभोवतालच्या शंभर मीटर परिसरात निर्बंध घालणे जरुरीचे असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. फौजदारी संहिता प्रक्रिया १९७३च्या कलम १४४ नुसार विद्यापीठ आणि सभोवतालच्या शंभर मीटर परिसरात विद्यार्थ्यांशिवाय इतर व्यक्तींना एकत्र येण्यास, विद्यापीठात प्रवेश करण्यास प्रतिबंध, विद्यापीठ परिसरात दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली आहे. या आदेशातून विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, पोलिस अधिकारी, सुरक्षा अधिकारी यांना वगळण्यात आले आहे. विद्यापीठ परिसरात ध्वनिक्षेपकाचा वापर करण्यास, विद्यापीठ परिसरात कोणताही आक्षेपार्ह, दोन गटात वाद होईल असा मजकूर लिहिण्यास आणि छापील मजकूर चिकटवण्यास मनाई करण्यात आली आहे. या आदेशाचे भंग केल्यास कलम १८८ नुसार कारवाईचा इशारा आदेशाद्वारे देण्यात आला आहे.

### प्रवेश करण्यास प्रतिबंध

» गेल्या काही दिवसांत विद्यापीठाच्या बाहेरील व्यक्ती, संघटना यांनी विद्यापीठाची किंवा पोलिसांची पूर्वपरवानगी न घेता निदर्शने, आंदोलने, मोर्चा आयोजित करून, चिथावणी देणारी भाषणे, घोषणांद्वारे शांततेचा भंग करून शैक्षणिक वातावरण बाधित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या कामात व्यत्यय निर्माण होऊन अनेकदा भांडणे, मारामारी झाल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पूरक असे सौहार्दपूर्ण, शांततामय वातावरणाची आवश्यकता असल्याने विद्यापीठ आणि सभोवतालच्या शंभर मीटर परिसरात निर्बंध घालणे जरुरीचे असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. फौजदारी संहिता प्रक्रिया १९७३च्या कलम १४४ नुसार विद्यापीठ आणि सभोवतालच्या शंभर मीटर परिसरात विद्यार्थ्यांशिवाय इतर व्यक्तींना एकत्र येण्यास, विद्यापीठात प्रवेश करण्यास प्रतिबंध, विद्यापीठ परिसरात दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली आहे.

# श्री गणेश सहकारी बँक निवडणूक बिनविरोध!

## शंकर जगताप यांचे लोकनेते लक्ष्मण जगताप यांच्या पावलावर पाऊल!

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** श्री गणेश सहकारी बँक ही लोकसेवेचा वसा घेतलेली बँक असून, बँकेच्या माध्यमातून समाजातील तळागाळातील घटकांना याचा मोठा फायदा झाला आहे. लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप हे बँकेचे संस्थापक - संचालक होते. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाने या बँकेच्या माध्यमातून अनेकांचे व्यवसाय उभे राहिले आहेत. आपल्या ग्राहकांना वेगवान सेवा देण्यासाठी बँक कटिबद्ध असून, आगामी काळात बँकेचा व्यवसाय वृद्धीसाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, अशा भावना श्री गणेश सहकारी बँकेचे नवनिर्वाचित संचालक शंकर जगताप यांनी केले. सहकार क्षेत्राच्या माध्यमातून विकास करता येवू शकतो, हे समजून लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांनी पिंपळे गुरव येथे सन १९९८ साली बँकेची स्थापना केली. बँकेच्या माध्यमातून मिळणाऱ्या तत्पर सेवा, बँकेच्या वतीने देण्यात येणाऱ्या आकर्षक कर्ज योजना, ठेव योजना यामुळे बँकेकडे ग्राहकांचा ओघ सातत्याने वाढत आहे. श्री गणेश सहकारी बँक मर्यादित या बँकेची पंचवार्षिक




निवडणुकीचा सोमवारी अर्ज माघारीचा शेवटचा दिवस होता. त्यामध्ये सर्व १७ उमेदवार बिनविरोध निवडून (सन २०२३-२०२८) आले. या निवडलेल्या संचालक मंडळातून बँकेच्या अध्यक्ष व इतर पदाधिकारी निवडले जाणार आहेत. शंकर जगताप यांनी लोकनेते लक्ष्मण जगताप यांच्या पावलावर पाऊल टाकत बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याची परंपरा कायम ठेवली. या बद्दल खातेदार, सभासदांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. या निवडणुकीत निवडणूक अधिकारी म्हणून नागनाथ केंजेरी यांनी कामकाज पाहिले.

> “लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली श्री गणेश सहकारी बँक आजही आपली नियमित प्रगती करत आहे. यामुळे बँकेवर तिच्या ग्राहकांचा विश्वास दिवसेंदिवस वाढताना दिसून येत आहे. लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्यावर व बँकेवर ज्या पद्धतीने सभासदांनी व खातेदारांनी विश्वास ठेवला, तोच विश्वास आणि बँकेची नियमित प्रगती साधण्यासाठी आम्ही सर्व नवनिर्वाचित संचालक कटिबद्ध आहोत.
>
> **- शंकर जगताप,** नवनिर्वाचित संचालक.
> श्री गणेश सहकारी बँक मर्या., पिंपळे गुरव.

# शहरात साखळी बॉम्बस्फोटाचा कट!

## दहशतवाद्यांना सीरियातून सूचना

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
पुणे शहरात साखळी बॉम्बस्फोट घडविण्याच्या कट दहशतवाद्यांनी रचला होता. आयसिसच्या महाराष्ट्र गटातील दहशतवाद्यांना सिरीयातून याबाबतच्या सूचना मिळाल्याची धक्कादायक माहिती तपासात उघडकीस आली आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) मोहम्मद शाहनवाज आलम (रा. हजारीबाग, झारखंड) याला नुकतीच अटक केली. एनआयएने सहा दिवसांपूर्वी कोढव्यातू पसार झालेला दहशतवादी मोहम्मद शाहनवाज आलम उर्फ शफिकूर रहमान आलम याला अटक केली. त्याच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले नाही. आलमला एनआयएच्या कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले. आलमची एनआयच्या पथकाने चौकशी केली. तेव्हा पुण्यात साखळी बॉम्बस्फोट करण्याचा कट रचला होता.




याबाबत सिरीयातून सूचना मिळाल्याची माहिती त्याने एनआयएच्या अधिकाऱ्यांना चौकशीत दिली. दहशतवादी विचारधारेचा प्रसार, तसेच तरुणांची माथी भडकावून त्यांना दहशतवादी कारवायांमध्ये ओढणाऱ्या आयसिसच्या महाराष्ट्र गटाकडून पुणे, मुंबईसह देशभरात कारवाया करण्याचा कट रचला होता. याप्रकरणात अटक करण्यात आलेल्या सात दहशतवाद्यांकडून राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) मुंबईतील विशेष न्यायालयात नुकतेच आरोपपत्र दाखल केले. मोहम्मद इम्रान मोहम्मद युसुफ खान उर्फ मटका उर्फ अमीर अब्दुल हमीद खान, मोहम्मद युनुस मोहम्मद याकुब साकी उर्फ आदिल उर्फ आदिल सलीम खान (दोघे रा. रतलाम, मध्यप्रदेश), कादीर दस्तगीर पठाण उर्फ अब्दुल कादीर (रा. कोंढवा), समीब नासीरउद्दीन काझी (रा. कोंढवा), जुल्फीकार अली बडोदावाला उर्फ लालाभाई उर्फ सईफ, शामिल साकीब नाचन, अकिफ आतिफ नाचन (तिघे रा. पडघा, जि. ठाणे ) अशी आरोपपत्र दाखल केलेल्या दहशतवाद्यांची नावे आहेत. त्यांच्याविरुद्ध बेकायदा हालचाली प्रतिबंधक कायदा (यूएपीए), स्फोटके तयार करणे, बाळगणे (एक्सप्लोझिव्ह सबस्टन्स ॲक्ट), तसेच विविध कायद्यांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.जुलै महिन्यात पुण्यातील कोथरुड भागात दुचाकी चोरताना इम्रान खान, मोहम्मद साकी, मोहम्मद आलम यांना अटक करण्यात आली होती. कोंढव्यात आरोपी साकी, खान, आलम वास्तव्यास होते. त्यांच्या घराची झडती घेण्यात आली. तपासात तिथे दहशतवादी आयसिसच्या संपर्कात असल्याचे उघडकीस आले होते. महाराष्ट्र, गोवा, तेलंगणात आयसिसच्या विचारधारेचा प्रसार करण्याचे काम त्यांच्याकडे सोपविण्यात आले होते. दहशतवाद्याकडून पिस्तूल, स्फोटके सापडले होते. दहशतवादी कारवायांचे प्रशिक्षण देण्यासाठी कोंढव्यात प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. बॉम्बस्फोट घडविल्यानंतर अटक टाळण्यासाठी त्यांनी दुर्गम भागात लपण्याची जागा शोधली होती. पुण्यातील महत्वाच्या लष्करी संस्थांच्या परिसराचे त्यांनी ड्रोन कॅमेऱ्याद्वारे चित्रीकरण केले होते, असे एनआयएने दाखल केलेल्या आरोपपत्रात म्हटले आहे.

### चौकशीत अधिकाऱ्यांना दिली माहिती

» राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) मोहम्मद शाहनवाज आलम (रा. हजारीबाग, झारखंड) याला नुकतीच अटक केली. एनआयएने सहा दिवसांपूर्वी कोढव्यातू पसार झालेला दहशतवादी मोहम्मद शहानवाज आलम उर्फ शफिकूर रहमान आलम याला अटक केली. त्याच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले नाही. आलमला एनआयएच्या कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले. आलमची एनआयच्या पथकाने चौकशी केली. तेव्हा पुण्यात साखळी बॉम्बस्फोट करण्याचा कट रचला होता. याबाबत सिरीयातून सूचना मिळाल्याची माहिती त्याने एनआयएच्या अधिकाऱ्यांना चौकशीत दिली.

# महावितरणाला महापालिकेचा झटका!

## रस्ते खोदाई शुल्क वाढविण्याचा प्रस्ताव

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ आणि अन्य निमशासकीय कंपन्यांना भूमिगत विद्युत वाहिनी टाकण्यासाठीच्या रस्ते खोदाई शुल्कात वाढ करण्यात येणार आहे. भूमिगत विद्युत वाहिन्या टाकण्यासाठी २ हजार ३५० रुपये प्रतिमीटर ऐवजी आता ६ हजार ९६ रुपये प्रती मीटर महापालिकेकडे जमा करावे लागणार आहेत. महापालिकेच्या पथ विभागाने तसा प्रस्ताव स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी ठेवला आहे. स्थायी समितीच्या पुढील बैठकीत त्यावर निर्णय अपेक्षित आहे. विविध सेवा वाहिन्या टाकण्यासाठी खासगी मोबाईल कंपन्यांबरोबर शासकीय, निमशासकीय कंपन्यांकडून रस्ते खोदाई केली जाते. त्यासाठी ठराविक शुल्क आकारून पथ विभागाकडून परवानगी दिली जाते. त्यासाठी महापालिकेने २०१५ मध्ये रस्ते खोदाई शुल्क निश्चित केले होते. या शुल्कातून रस्ते दुरुस्तीचा खर्च वसूल केला जातो.




खासगी कंपन्यांसाठी प्रति मीटर १२ हजार १९२ रुपये दर असून, महावितरणसह अन्य शासकीय आणि निमशासकीय कंपन्यांसाठी प्रती मीटर २ हजार ३५० रुपये शुल्क आकारले जाते. तसेच एचडीडी तंत्रज्ञानाने रस्ते खोदाई, पीट्सह रस्ते खोदाई यासाठी निरनिराळे शुल्क आकारले जाते.

गेल्या महिन्यात पालकमंत्री अजित पवार यांनी विकासकामांसंदर्भात आढावा बैठक घेतली होती. त्यावेळी महापालिका आणि महावितरण यांनी एकमेकांविरोधात तक्रारी केल्या होत्या. या बैठकीत पवार यांनी महावितरणला मूळ खोदाई शुल्कात सवलत देण्यात येऊ नये, असे स्पष्ट केले होते.

त्यानुसार पथ विभागाने हा प्रस्ताव तयार केला आहे. स्थायी समितीपुढे तो मान्यतेसाठी ठेवण्यात आला असून, त्यावर पुढील बैठकीत निर्णय अपेक्षित आहे.

### प्रती मीटर २ हजार ३५० रुपये शुल्क

» खासगी कंपन्यांसाठी प्रति मीटर १२ हजार १९२ रुपये दर असून, महावितरणसह अन्य शासकीय आणि निमशासकीय कंपन्यांसाठी प्रती मीटर २ हजार ३५० रुपये शुल्क आकारले जाते. तसेच एचडीडी तंत्रज्ञानाने रस्ते खोदाई, पीट्सह रस्ते खोदाई यासाठी निरनिराळे शुल्क आकारले जाते. गेल्या महिन्यात पालकमंत्री अजित पवार यांनी विकासकामांसंदर्भात आढावा बैठक घेतली होती. त्यावेळी महापालिका आणि महावितरण यांनी एकमेकांविरोधात तक्रारी केल्या होत्या. या बैठकीत पवार यांनी महावितरणला मूळ खोदाई शुल्कात सवलत देण्यात येऊ नये, असे स्पष्ट केले होते.